# वसई-विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय विरार

दि.१३/०८/२०२४

**<u>“घरोघरी तिरंगा” अभियानांतर्गत महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत रॅली संपन्न</u>**

शासनाकडून प्राप्त निर्देशानुसार ‘घरोघरी तिरंगा’ हे अभियान दि.०९ ऑगस्ट २०२४ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अनुषंगाने दि.१३ ऑगस्ट रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत “घरोघरी तिरंगा” रॅली काढण्यात आली. या रॅलीत वैद्यकीय आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांमार्फत तिरंगा घेऊन देश भक्तीच्या घोषणा देण्यात आल्या, तसेच राष्ट्रीय व देशभक्तीचे गीत गायन करण्यात आले व सर्व नागरीकांनी दि.१३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२४ या दिवशी “घरोघरी तिरंगा” या मोहिमेत मोठ्या प्रमाणात सहभागी होणेबाबत जनजागृती करण्यात आली.

सदर रॅलीची सुरवात माणिकपूर शाळा येथून करण्यात आली व त्याची सांगता वसई स्टेशन रोड पश्चिम बस स्थानकाजवळ करण्यात आली. सदर रॅलीत प्रभाग समिती एच चे कर्मचारी तसेच वैद्यकीय आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी, GNM, ANM, लॅब टेक्निशियन इत्यादी कर्मचारी असे एकूण ६५० ते ७०० कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

मुख्य कार्यालय विरार
वसई विरार शहर महानगरपालिका